http://www.sgbauonline.com/



# M.A. Part—II (Marathi) Semester—III Examination

## MARATHI

## (Bhasha Vidnyan)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

सूचना :—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिवेळा लिहिल्यास पहिले उत्तर मूल्यांकनासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

1. भाषाविज्ञानाच्या विविध जोडशाखांचा आढावा घेऊन समाज भाषाविज्ञानाचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

मानवी भाषेचे विविध गुणधर्म स्पष्ट करा.

2. उच्चार व लेखन यांतील फरक सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा.

3. उच्चारण स्थानावर आधारित आणि उच्चारण प्रयत्नावर आधारित स्वनांचे वर्गीकरण कसे केले जाते, ते मराठी भाषेच्या संदर्भात स्पष्ट करा.

किंवा

स्वनिम निश्चित करण्याची तत्त्वे सोदाहरण स्पष्ट करा.

4. रूपिकांचे रूपिमांमध्ये वर्गीकरण कसे केले जाते ? सविस्तर लिहा.

किंवा

अर्थाच्या विविध व्याख्यांचा आढावा घेऊन सांकल्पनिक अर्थाविषयी माहिती द्या.

5. योग्य पर्याय निवडून खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहा. (उदा. प्रश्न क्र. 1 (क) संत तुकाराम)

(1) 'लँग्वेज' हे पुस्तक कोणी लिहिले ?

(अ) सोस्यूर (ब) ब्लूमफिल्ड

(क) चॉम्स्की (ड) बॉप

(2) ध्वनिपरिवर्तनाचा सिद्धांत खालीलपैकी कोणत्या भाषावैज्ञानिकाने मांडला आहे ?

(अ) ग्रीम (ब) ग्रिअर्सन

(क) चॉम्स्की (ड) हॉकेट



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) 'र' हा स्वन कोणत्या प्रकारचा स्वन ठरतो ?

(अ) ताडित (ब) पार्श्विक

(क) कंपित (ड) घर्षक

(4) चॉम्स्की प्रत्यक्ष भाषिक व्यवहार वा उच्चार यास म्हणतो ______

(अ) लांग (ब) भाषिक प्रयोग (Performance)

(क) भाषिक क्षमता (Competence) (ड) भाषिक व्यवस्था

(5) स्वनांमध्ये व्यवच्छेदक विनियोग आढळल्यास त्या स्वनांना भाषेचे ____ ठरवता येते.

(अ) स्वनिम (ब) स्वनांतर

(क) रूपिम (ड) रूपिकांतर

(6) 'घरगुती', 'हातखंडा', 'पांढराफटक' या शब्दांतील 'गुती', 'खंडा', 'फटक' हे कोणत्या प्रकारचे रूपिम ठरतात ?

(अ) मिलन रूपिम (ब) आशयसूचक रूपिम

(क) स्वनिमाश्रयी रूपिम (ड) अनन्यसाधारण रूपिम

(7) प्रथमोपस्थित संघटक पद्धती खालीलपैकी कशासाठी उपयोगात आणल्या जाते ?

(अ) स्वनिमनिश्चिती (ब) वाक्याचे विश्लेषण

(क) रूपिमनिश्चिती (ड) स्वनांचे वर्गीकरण

(8) वर्णनात्मक भाषाविज्ञानाला 'एककालिक भाषाविज्ञान' असे नाव कोणी दिले ?

(अ) सोस्यूर (ब) विल्यम जोन्स

(क) चॉम्स्की (ड) ब्लूमफिल्ड



http://www.sgbauonline.com/